# बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

Phone No. –( 02472) 220159

Email.exe.enggworksdharashiv@gmail.com

जा.क्र.जिपधा/बांवि/आस्था-१/कावि/ ९९१ /२०२४ दिनांक- १४/०५/२०२४

प्रति,

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

**विषय :- जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गतगट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-2023**
**कागदपत्र पडताळणीकरीता दि.28/05/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहणे बाबत...**

संदर्भ :- १) जिल्हापरिषद धाराशिव यांचेकडील सरळसेवा पदभरती सन 2023 साठीची जाहिरात क्रमांक-1/2023 दिनांक 05/08/2023

२) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ग्रामीण पाणी पुरवठा) यापदासाठी IBPS मुंबई यांचेकडील Online परिक्षेतील प्राप्त निकाल

3) या कार्यालयाचे पत्र क्रं.जिपधा/आस्था-1/कावी/354-356/2024 दिनांक 13/05/2024

उपरोक्त विषयी जिल्हापरिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती - 2023 साठी जाहिरात क्र.1/2023 दि.05 ऑगष्ट, 2023 च्याअनुषंगाने IBPS कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ग्रापापु)** या पदाच्या Online परिक्षेमधील प्राप्त निकालानुसार पात्र गुणवत्ता धारक उमेदवारांची यादी या जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेत स्थळावर दि. 12/03/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ग्रापापु)** पदासाठी जाहिराती मध्ये नमुद विविध प्रवर्गातील रिक्त पदेभरणेसाठी प्रवर्गनिहाय कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हापरिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर दि. 14/05/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ग्रापापु)** संवर्गातील भरावयाच्या प्रवर्ग निहाय रिक्त पदासाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक व इतरआवश्यक सर्व अभिलेखे तसेच जाहिराती मधील नमूद आवश्यक कागदपत्राची पडताळणी **दि.28/05/2024 रोजी सकाळी** 11.00 वाजता कै.यशवंतराव चव्हाण, जिल्हा परिषद सभागृह धाराशिव येथे करण्यात येणारआहे.

सबब याद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपले मुळ शैक्षणिक व इतरआवश्यकअभिलेखे तसेच जाहिराती मधील नमूद आवश्यक कागदपत्र व त्याच्या एका साक्षांकित प्रतीसह कागदपत्र पडताळणीसाठी दि. 28/05/2024 रोजी वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्र पडताळणी साठी ठरवून दिलेल्या दिनांकास गैरहजर राहणा-या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीसाठी नंतर विचार केला जाणार नाही. सदर उमेदवारास निवड प्रक्रियेसंबंधात कोणाताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सोबत :- कागद पत्र पडताळणीसाठी घेवून यावयाच्या कागदपत्राची यादी.**

**(जरिचंद सावंत)**
कार्यकारी अभियंता (बां) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव.

**प्रतिलिपी :-**

1) मा.जिल्हाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

2) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

स्वाक्षरित/-

**(जरिचंद सावंत)**
कार्यकारी अभियंता (बां) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव.

Scanned with OKEN Scanner

**जिल्हा परिषद धाराशिव सरळसेवा पदभरती-२०२३**

**या कार्यालयाने प्रसिध्द करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/प्रापापु) पदासाठी उमेदवारांनी**

कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्रांची यादी

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा |
| २. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४. | वयाचा पुरावा |
| ५. | जन्माचा पुरावा |
| ६. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याचा पुरावा |
| ७. | राखीव प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जातपडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १०. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११. | खेळाडुसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १२. | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १३. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषीक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५. | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७. | लहान कंटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १८. | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९. | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २०. | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१. | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२. | अनुभव प्रमाणपत्र |
| २३. | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४. | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड,राज्य निवडणुक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे खातेपुरतक) |

**(जरिचंद सावंत)**
**कार्यकारी अभियंता (बां) तथा**
**सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with OKEN Scanner